दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४० | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७,
विक्रम संवत २०८२
विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु
माघ मास, कृष्णपक्ष, दशमी दुपारी १२-२३ पर्यंत
नंतर एकादशी तिथी
दिवस नक्षत्र– ज्येष्ठा दुपारी १-४२ पर्यंत नंतर मूळ,
योग– हर्षण रात्री ३-०६ पर्यंत नंतर वज्र

### पुणे पोलिसांचा दणका!

**पुणे** : शहरातील वाढत्या वाहतूक नियमभंगावर लगाम घालण्यासाठी पुणे शहर वाहतूक पोलिसांनी ट्रिपल सीट दुचाकींविरोधात विशेष मोहीम हाती घेत मोठी कारवाई केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार तसेच सह पोलीस आयुक्त आणि अपर पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान तब्बल १,४५४ ट्रिपल सीट वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यातून १६,१८,४०० इतकी रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली.

## सारांश वृत्त

### पाटणा कोर्ट बॉम्बने उडवण्याची धमकी

**पाटणा :** बिहारमधील पाटणा दिवाणी न्यायालयात बुधवारी बॉम्बची धमकी मिळाली, जी नंतर खोटी ठरली आणि एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत ही दुसरी घटना असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सोमवारी आणि त्यापूर्वी ८ जानेवारी रोजीही न्यायालयाच्या अधिकाऱ्यांना अशाच प्रकारची ईमेल धमकी मिळाली होती. न्यायालयाच्या अधिकाऱ्यांना बॉम्बची धमकी मिळाली. आम्ही परिसर रिकामा केला आणि जोरदार शोध मोहीम हाती घेतली. तथापि, ती खोटी असल्याचे निष्पन्न झाले.

### लाच घेताना महसूल अधिकाऱ्यांना अटक

**फरिदाबाद** : फरिदाबाद लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी एका महसूल अधिकाऱ्याला आणि त्याच्या सहाय्यकाला २०,००० रुपयांची लाच घेतल्याबद्दल अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपींची ओळख पटवारी जितेंद्र आणि त्याचा सहकारी विनोद अशी झाली आहे, असे त्यांनी सांगितले. शत्रुजित शर्मा यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे की, ते गेल्या अनेक महिन्यांपासून तहसील कार्यालयात फेरफार करत होते, परंतु त्यांचे काम केले जात नव्हते.




### स्कूल बसने दोन बालकांना चिरडले

**बेंगळुरू** : शहरातील वडिलांसमोर एका शाळेच्या बसने दोन मुलांना चिरडले, असे पोलिसांनी सांगितले. हा अपघात थानिसांद्रा येथे झाला. नागना गौडा, एक पोलिस कर्मचारी, त्यांची मुलगी वर्षा (२) आणि त्यांच्या मोठ्या भावाची मुलगी भानू (४) यांना त्यांच्या मोटारसायकलवरून दूध खरेदी करण्यासाठी घेऊन जात होते. त्यावेळी हा दुर्दैवी अपघात झाला.

## भारत-अमेरिका व्यापार करारावरून राहुल गांधींचा हल्लाबोल

# केंद्राने देशाचे भविष्य धोक्यात घातले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी भारत-अमेरिका व्यापार करारावरून भाजपप्रणीत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या आर्थिक व्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी देशातील १.४ अब्ज नागरिकांचे भविष्य धोक्यात घातल्याचा आरोप त्यांनी केला.

लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ वरील चर्चेत सहभागी होताना गांधी म्हणाले की, अमेरिकेच्या दबावाखाली सरकारने भारताच्या हिताशी तडजोड केली आहे. "पंतप्रधान सामान्य परिस्थितीत देश विकणार नाहीत, हे मला माहीत आहे. पण सध्या त्यांच्यावर दबाव आहे. जेव्हा कुणाचा गळा दाबला जातो, तेव्हा डोळ्यांत भीती दिसते. ती भीती पंतप्रधानांच्या डोळ्यांत स्पष्ट दिसते," असा आरोप त्यांनी केला. गांधी म्हणाले की, हे आत्मसमर्पण केवळ पंतप्रधानांचे नसून संपूर्ण देशाच्या भवितव्याचे आहे. "१.४ अब्ज भारतीयांचे भविष्य भाजपच्या आर्थिक व्यवस्थेच्या रक्षणासाठी पणाला लावण्यात आले आहे. ही व्यवस्था सध्या अमेरिकेत खटल्यांच्या कचाट्यात आहे," असे ते म्हणाले.

भारत-अमेरिका व्यापार कराराचा उल्लेख करताना गांधी यांनी शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड झाल्याचा दावा केला. अमेरिकेतील कृषी उत्पादने भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणावर येणार असल्याने देशातील शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल, असे त्यांनी सांगितले. "आपले शेतकरी वादळाचा सामना करत आहेत. यांत्रिकीकृत अमेरिकन शेतीसाठी तुम्ही दारे उघडली आहेत. हे लज्जास्पद आहे. यापूर्वी कोणत्याही पंतप्रधानांनी असे केले नाही आणि भविष्यातही कोणी करणार नाही," अशी टीका त्यांनी केली.

ऊर्जा आणि वित्त क्षेत्रावरही गांधी यांनी गंभीर आरोप केले. "आपण मान्य करता की देश संकटात आहे. तरीही अमेरिकेला आपल्या विरोधात ऊर्जा आणि वित्त शस्त्र म्हणून वापरण्याची मुभा दिली आहे. आपण कोणाकडून तेल खरेदी करायचे, हे ठरवण्याचा अधिकारही इतरांच्या हाती दिला आहे. मग तुम्ही या सभागृहात कसे येऊ शकता? तुम्हाला लाज वाटत नाही का?" असा सवाल त्यांनी केला.

देशाचा डेटा ही सर्वात मोठी ताकद असल्याचे सांगत गांधी यांनी आरोप केला की, कोणतीही ठोस वाटाघाटी न करता हा डेटा अमेरिकेला दिला जात आहे. "जर आमचे सरकार असते, तर समानतेच्या आधारावर चर्चा झाली असती. भारतीय लोकांचा डेटा ही आमची मौल्यवान संपत्ती आहे," असे त्यांनी नमूद केले.

गांधींच्या भाषणाला उत्तर देताना केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हा संपूर्ण आरोपांचा पाढा खोटेपणाने भरलेला असल्याचे सांगितले. राहुल गांधी यांनी केलेली विधाने सभागृहाच्या नोंदीतून वगळण्याची मागणी सत्ताधारी पक्ष करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## काँग्रेस खासदारांची सभापतींच्या दालनात घुसून शिवीगाळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सुरू असलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी काँग्रेस खासदारांवर गंभीर आरोप केले. किमान वीस ते पंचवीस काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्षांच्या दालनात घुसून त्यांना शिवीगाळ केल्याचा दावा रिजिजू यांनी केला. या घटनेवेळी प्रियंका गांधी वाड्रा, के. सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते, असा आरोपही त्यांनी केला.

बुधवारी संसद भवनात पत्रकारांशी बोलताना रिजिजू म्हणाले की, लोकसभा अध्यक्ष अत्यंत दुखावले गेले आहेत. आपण स्वतः त्यांच्याशी बोललो असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस खासदारांनी सभापतींच्या दालनात जाऊन त्यांच्याबद्दल अपशब्द वापरले, वाईट भाषेत टीका केली आणि नंतर सभापतींचा निर्णय मान्य करण्यास नकार दिला, असा आरोप त्यांनी केला. रिजिजू म्हणाले की, त्यानंतर राहुल गांधी यांनी सभागृहात बोलण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नसल्याचे सांगितले आणि आपल्या मनाप्रमाणे बोलण्याचा दावा केला. मात्र, सभापतींच्या परवानगीशिवाय कोणीही सभागृहात बोलू शकत नाही, हे सर्व नोंदींमध्ये स्पष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री म्हणाले की, जेव्हा वीस ते पंचवीस काँग्रेस खासदार सभापतींच्या दालनात घुसले, तेव्हा ते स्वतःही तेथे गेले होते. सभापतींना केलेली शिवीगाळ इतकी गंभीर होती की तिचे वर्णन करणे शक्य नाही, असे त्यांनी सांगितले. सभापती सौम्य स्वभावाचे असल्यामुळे कठोर कारवाई करण्यात आली नाही, असेही त्यांनी सांगितले.

## व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता
# बँक कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : उद्या, १२ फेब्रुवारी २०२६ रोजी बँकांशी संबंधित महत्त्वाची कामे असलेल्या ग्राहकांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

देशातील प्रमुख बँक कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यांसाठी एक दिवसाच्या देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे अधिकृत सुट्टी नसली तरी बँकांचे कामकाज विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कॅलेंडरनुसार १२ फेब्रुवारी रोजी कोणतीही शासकीय सुट्टी नाही. मात्र, कर्मचाऱ्यांच्या संपामुळे अनेक बँकांमध्ये व्यवहारांवर परिणाम होऊ शकतो. शाखांमध्ये कर्मचारी उपस्थिती कमी राहण्याची शक्यता असल्याने रोख व्यवहार, धनादेश क्लिअरन्स तसेच इतर सेवा मंदावण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन, ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशन आणि बँक एम्प्लॉईज फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनांनी आपल्या सदस्यांना संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या संघटना दहा केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त आंदोलनात सहभागी होत आहेत. नवीन कामगार संहितांचा बँक कर्मचाऱ्यांच्या हिताला धक्का बसत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. याशिवाय आठवड्यातून पाच दिवस कामकाजाची अंमलबजावणी आणि कामाच्या ठिकाणी योग्य ताणतणाव व्यवस्थापन या बँक संघटनांच्या प्रमुख मागण्या असल्याचे सांगण्यात आले आहे.

## पुणे विभागात सर्वाधिक कॉपीची प्रकरणे आढळली

# बारावीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेण्यात येत आहेत. मंडळाकडून इयत्ता बारावीच्या प्रमाणपत्र लेखी परीक्षेला मंगळवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यभरात एकूण ४२ कॉपीच्या गैरप्रकाराची नोंद करण्यात आली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत ही संख्या कमी आहे.

विभागनिहाय आकडेवारी पाहता, पुणे विभागात सर्वाधिक २० प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. अमरावती विभागात १२, नाशिकमध्ये ४, नागपूरमध्ये १, छत्रपती संभाजीनगरमध्ये ३ आणि लातूर विभागात २ प्रकरणे आढळून आली आहेत. विशेष म्हणजे मुंबई, कोल्हापूर आणि कोकण विभागात एकही गैरमार्ग प्रकरण नोंदलेले नाही. मंडळाकडून परीक्षेदरम्यान कडक उपाययोजना राबवण्यात आल्या होत्या. केंद्र संचालक, पर्यवेक्षक, भरारी पथके तसेच व्हीडीओ निरीक्षण यंत्रणेमुळे परीक्षेतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यात काही ठिकाणी यश आले पण काही ठिकाणी यश आले नाही. बीड तालुक्यातील चौसाळा येथील आर्टस् अँड सायन्स या परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणात कॉप्यांचा सुळसुळाट असल्याचे दिसून आले. तरुण मंडळींनी नातेवाईकांना कॉप्या पुरवण्यासाठी कॉलेजच्या बाहेर एकच गर्दी केली होती.

एका दृश्यामध्ये परीक्षा केंद्राच्या बाहेरून मोठ्या प्रमाणात काही तरुण कॉलेजमधील विद्यार्थ्यांना कॉपी देत असल्याचे दिसत होते.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जैतापूर (ता. कन्नड) इथल्या राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयात सीसीटीव्हीसमोर मास कॉपीची, तर अहिल्यानगर नऊ, तर जळगाव जिल्ह्यात चार कॉपीबहाद्दरांवर कारवाईची नोंद घेण्यात आली. दक्षता समितीच्या आदेशानुसार केंद्रसंचालकासह तब्बल १९ जणांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली असून, पहिल्याच पेपरला झालेली ही आजपर्यंतची सर्वांत मोठी परीक्षा-संबंधित कारवाई आहे. अहिल्यानगरमध्ये बारावीच्या परीक्षेत पहिल्या दिवशी जिल्ह्यात नऊ विद्यार्थ्यांवर कॉपी केस करण्यात आल्या. पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यात कॉपी केसचे प्रकार आढळले. १ हजार १४३ विद्यार्थ्यांनी दांडी मारली. पाथर्डी तालुक्यात सात कॉपी केस आढळून आल्या. शेवगाव तालुक्यातील दोन विद्यार्थ्यांवर कॉपीप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. राज्यभरात बारावीच्या परीक्षेला सुरुवात झाली असून, पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाचा पेपर पार पडला. या परीक्षेसाठी १५ लाखांहून अधिक विद्यार्थी नऊ विभागांतील विविध परीक्षा केंद्रांवर उपस्थित होते. परीक्षेपूर्वी केंद्रप्रमुखांकडून विद्यार्थ्यांना कॉपी न करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार बहुतांश ठिकाणी परीक्षा शांततेत पार पडली. काही केंद्रांवर विद्यार्थी तणावात दिसत होते, तर अनेक ठिकाणी उत्साहाचे वातावरण होते. दरम्यान, खबरदारी घेण्यात आली असतानाही काही मोजक्या ठिकाणी कॉपीचे प्रकार घडल्याचे उघडकीस आले आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसबाबत दिल्लीत खलबत

## सुनेत्राताईंची आधी मोदी अन् नंतर अमित शाह यांच्यासोबत बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. मंगळवारी रात्री उशिरा दिल्लीत दाखल झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज सकाळी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यासह पार्थ पवार, जय पवार, सुनील तटकरे आणि स्वत: प्रफुल्ल पटेल यांनीही आधी पंतप्रधान मोदी आणि नंतर अमित शाह यांची भेट घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी रात्री उशिरा दिल्लीत येऊन भाजप नेतृत्वाची भेट घेऊन नंतर ते मुंबईला परतल्याची माहिती समोर आली होती. या सर्व घडामोडी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण या दृष्टीने एकत्रितपणे जोडून पाहिल्या जात आहेत. सध्या राज्यसभेच्या खासदारही असलेल्या पवार मध्यंतरी घडलेल्या घडामोडीनंतर प्रथमच दिल्लीत गेल्या आहेत.

सुनेत्रा पवार यांच्यासह त्यांच्या दोन्ही पुत्रांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत जवळपास ४० मिनिटे त्यांच्यासोबत चर्चा केली. तसंच नंतर अमित शाह यांच्यासोबतही अर्धा तास चर्चा केली.

### पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू

**बीड** : बीड येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान दीपक वाहुळ या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. परळी तालुक्यातील मांडेखेल गावचा रहिवासी असलेला दीपक सकाळी भरतीसाठी मैदानात दाखल झाला होता. १६०० मीटर धावण्याची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर दीपकला अचानक अशक्तपणा आणि डीहायड्रेशनचा त्रास जाणवू लागला. मैदानावर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ऊसतोड कामगाराचा मुलगा असलेल्या दीपकने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पोलीस होण्याचे स्वप्न जपले होते.

# पीडित महिलेबाबत आक्षेपार्ह लिखाण

## वकिलाची सर्वोच्च न्यायालयाकडून कानउघडणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : केरळमधील काँग्रेस आमदार राहुल ममकूटाथिल यांच्याविरुद्ध बलात्काराची तक्रार करणाऱ्या पीडित महिलेबाबत सामाजिक माध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने एका महिला वकिलाची तीव्र शब्दांत कानउघडणी केली. "एक महिला दुसऱ्या महिलेबद्दल अशा भाषेत कशी लिहू शकते?" असा संतप्त सवाल न्यायालयाने केला.

या प्रकरणात ॲडव्होकेट दीपा जोसेफ यांनी अटकेची शक्यता असल्याने संरक्षण मागत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीदरम्यान पोस्टमधील भाषेवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश म्हणाले, "तुम्ही वकील आहात. तुमच्याकडून अशी भाषा अपेक्षित आहे का? शब्दांची कोणतीही मर्यादा ठेवलेली दिसत नाही, आणि तरीही पश्चात्ताप नाही." न्यायमूर्ती बागची यांनीही पोस्टमधील मजकूर अत्यंत अपमानजनक असल्याचे नमूद केले. यावेळी दीपा जोसेफ यांनी, पीडितेच्या पतीकडून मिळालेल्या माहितीनुसारच आपण पोस्ट लिहिल्याचा दावा केला. मात्र, "विश्वासाने दिलेली माहिती सार्वजनिक करण्यासाठी तुम्हाला कोणी अधिकृत केले होते का?" असा थेट सवाल न्यायालयाने केला. "एक महिला म्हणून माझे म्हणणे ऐकून घ्यावे," अशी विनंती केल्यानंतरही न्यायालय नरमले नाही. उलट, "पुरुषाने असे केले असते तर तात्काळ अटकेचे आदेश दिले असते," असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. या प्रकरणात थेट हस्तक्षेप करण्यास नकार देत सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश दिले आणि याचिका फेटाळून लावली.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी घोषणा होण्याची शक्यता

# राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी पार्थ पवार इच्छुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी त्यांचे पुत्र पार्थ पवार हे इच्छुक असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून कळते. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी याबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षात नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पक्षातील काही नेते दीर्घकाळ मंत्रिमंडळात असले तरी राज्यपातळीबाहेर त्यांचा प्रभाव मर्यादित असल्याचे मत पक्षांतर्गत व्यक्त होत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात ठसा उमटवेल, असे नेतृत्व सध्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे नसल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांमध्ये आहे.

दरम्यान, राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी एका बिगरमराठी नेत्याचे नाव पुढे येताच आमदार आणि कार्यकर्त्यांत तीव्र नाराजी व्यक्त झाली होती. त्यामुळे ते नाव मागे पडले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीच राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारावे, अशीही मागणी पक्षात होती. मात्र उपमुख्यमंत्रिपदाची मोठी जबाबदारी लक्षात घेता, त्यांनी आणि पक्षातील निवडक नेत्यांनी पार्थ पवार यांचे नाव पुढे आणल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. सुमारे ३० ते ३५ आमदार, विविध सेलचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिल्याची माहिती आहे.


सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यामुळे त्यांना सहा महिन्यांत खासदारकीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पार्थ पवार यांना राज्यसभेत पाठवले जाईल, अशी चर्चा होती. मात्र, अल्पकालीन जागेऐवजी सहा वर्षांच्या कार्यकाळाच्या जागेवरून त्यांना राज्यसभेत पाठवण्याचा विचार सुरू असल्याचे समजते, जेणेकरून त्यांचा राष्ट्रीय राजकारणात प्रवेश सुलभ होईल.

पार्थ पवार यांनी २०१९ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती, मात्र त्यांना अपयश आले होते. आता अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांना पूर्णवेळ राजकारणात सक्रिय करण्याबाबत पवार कुटुंबानेही संमती दर्शविल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, ही तयारी २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. सुनेत्रा पवार यांना देशभर दौरे करणे शक्य नसल्याने, पार्थ पवार यांच्यावर आतापासूनच जबाबदारी दिल्यास पक्षाला दीर्घकालीन फायदा होईल, असा मतप्रवाह पक्षात बळावत आहे. त्यामुळे पार्थ पवार यांचा अध्यक्षपदाचा मार्ग अधिक सोपा झाल्याचेही या सूत्राने म्हटले आहे. तसेच, गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात चर्चेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना सध्या पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यानंतर मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार, सध्या तरी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे आपली राजकीय वाटचाल अधिक बळकट करण्यावर भर देणार असल्याचे चित्र आहे.

# बिगर कृषी वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्याच्या जमीन महसूल कायद्यात महत्त्वाचा बदल करण्यात आला असून, आता जमिनीच्या बिगर कृषी (नॉन-अग्रीकल्चरल) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता राहिलेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भातील दुरुस्ती लागू केली आहे.

नव्या तरतुदीनुसार बिगर कृषी कर आकारण्याची पद्धत पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. यापुढे जमीन मालकांना फक्त एकदाच रूपांतरण अधिमूल्य भरावे लागणार असून, ही रक्कम भरल्यानंतर जमीन थेट अकृषक वापरासाठी रूपांतरित करता येणार आहे. तसेच, स्वतंत्र सनद घेण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.

बांधकाम आराखड्याला संबंधित प्राधिकरणाची मंजुरी मिळाल्यास तीच मंजुरी बिगर कृषी वापराची मानली जाणार आहे. त्यामुळे जमिनीचे रूपांतर करण्याची प्रक्रिया अधिक जलद, सोपी आणि पारदर्शक होणार आहे. यापूर्वी बिगर कृषी वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी, तसेच मोठ्या प्रमाणावर कागदपत्रांची पूर्तता आवश्यक होती.

## संपादकीय

### विस्तारणाऱ्या महानगरांचा श्वास कोंडलेला



**मुंबई तिसऱ्या क्रमांकावर प्रदूषित शहर ठरणे ही विकासाच्या दिशेची धोक्याची घंटा आहे. मुंबई-पुण्याचा राक्षसी विस्तार, वाहतूक, बांधकाम आणि नियोजनशून्य शहरीकरण यांचा मेळ घातक ठरतो आहे. हा प्रश्न हवामानाचा नसून धोरणांचा आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.**

मुंबई देशातील तिसऱ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर ठरते, ही बाब धक्कादायक वाटावी अशी नाही; ती दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या शहरी नियोजनाची अपरिहार्य परिणती आहे. राजधानी दिल्ली आणि कोलकात्यानंतर मुंबईचा क्रमांक लागणे, आणि त्याच वेळी नवी मुंबईही 'खराब हवा' श्रेणीत असणे, हे एकत्र पाहिले तर प्रश्न केवळ एका महानगराचा उरत नाही. तो संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाचा, आणि विस्ताराने पुण्यापर्यंत पसरलेल्या शहरी पट्ट्याचा बनतो. मुंबईच्या प्रदूषणाकडे पाहताना आपण अनेकदा 'भौगोलिक सवलत' देतो. समुद्रकिनाऱ्यावरील वारे, पावसाचे प्रमाण, तुलनेने कमी थंडी यामुळे मुंबई दिल्लीसारखी कोंडली जाणार नाही, असा एक समज आहे. मात्र गेल्या काही वर्षांची आकडेवारी हा गैरसमज मोडून काढते. एक्यूआय सातत्याने १५० च्या पुढे राहणे, अनेकदा २०० चा टप्पा ओलांडणे, आणि 'श्वास घेण्यास अपायकारक' अशी श्रेणी गाठणे, हे अपवाद राहिलेले नाही. याचा अर्थ मुंबईचा नैसर्गिक बचाव आता अपुरा ठरतो आहे. या स्थितीला जबाबदार घटक नव्याने शोधावे लागतील, असे नाही. अनियंत्रित बांधकाम, वाढती खासगी वाहने, सार्वजनिक वाहतुकीची अपुरी क्षमता, सतत सुरू असलेली खोदकामे, रस्त्यांवरील धूळ आणि औद्योगिक उत्सर्जन हे सारे घटक दशकानुदशके परिचित आहेत. प्रश्न आहे तो या सगळ्याला एकत्रितपणे सामोरे जाण्याच्या इच्छाशक्तीचा. मुंबईमध्ये विकास प्रकल्पांची संख्या वाढते आहे, पण त्यांचा पर्यावरणीय समन्वय मात्र घटतो आहे. नवी मुंबईची स्थिती याचाच विस्तार आहे. नियोजित शहर म्हणून ओळख मिळवलेल्या नवी मुंबईतही हवा खराब ठरते, याचा अर्थ नियोजन हे कागदावरच थांबले आहे. विमानतळ, औद्योगिक वसाहती, लॉजिस्टिक हब, मोठ्या प्रमाणावरील गृहप्रकल्प या सगळ्यांनी नवी मुंबईचा श्वास गुदमरवला आहे. मुंबईतील प्रदूषण नवी मुंबईकडे, आणि नवी मुंबईतील ताण पुढे पनवेल, खोपोलीकडे सरकतो आहे. याच चित्राचा पुढचा अध्याय म्हणजे पुणे. पुणे हे आता 'विद्येचे शहर' किंवा 'निवृत्तीचे शहर' राहिलेले नाही. आयटी, ऑटोमोबाईल्स, शिक्षण आणि रिअल इस्टेट यांच्या संयोगातून ते वेगाने फुगत आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, प्रस्तावित महामार्ग, रेल्वे विस्तार आणि औद्योगिक कॉरिडॉरमुळे या दोन शहरांमधील अंतर भौगोलिक उरलेले नाही. प्रदूषणाचाही प्रवास याच मार्गाने होतो आहे. पुण्यातील वाढते वाहनप्रमाण, बांधकामांची धूळ आणि हरित क्षेत्रांचा ऱ्हास यामुळे तेही हळूहळू मुंबईच्या वाटेवर निघाले आहे. ही सगळी समस्या हवामानाची नाही, तर विकास मॉडेलची आहे. आपण शहरांचा विस्तार हा नेहमीच जमिनीच्या वापराचा प्रश्न म्हणून पाहिला. हवा, पाणी, तापमान, आरोग्य—या घटकांना दुय्यम स्थान दिले. मुंबई-पुणे पट्ट्यातील विकास हा प्रामुख्याने रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा यांभोवती फिरत राहिला. सार्वजनिक आरोग्य हा परिणाम म्हणून स्वीकारला गेला, उद्दिष्ट म्हणून नव्हे. महापालिकांचे अर्थसंकल्प दरवर्षी वाढतात. मुंबईचा अर्थसंकल्प ८० हजार कोटींच्या घरात जाण्याची शक्यता वर्तवली जाते. मात्र या कोट्यवधी रुपयांतून हवा स्वच्छ करण्यासाठी नेमके काय केले जाते, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. रस्ते धुणे, काही झाडे लावणे किंवा सेन्सर बसवणे, एवढ्यावर हा प्रश्न सुटणारा नाही. वाहतूक धोरण, बांधकाम नियंत्रण, सार्वजनिक वाहतुकीचे प्राधान्य, औद्योगिक उत्सर्जनावर कडक नियंत्रण या सगळ्यांचा एकत्रित आराखडा हवा. मुंबई आणि पुण्याच्या विस्ताराकडे स्वतंत्र शहर म्हणून पाहणे आता शक्य नाही. हा एकच शहरी परिसंस्थेचा पट्टा बनतो आहे. त्यामुळे धोरणेही विभागनिहाय नव्हे, तर प्रदेशनिहाय आखावी लागतील. मुंबईत वाहनांची संख्या रोखली, पण पुण्यात ती दुपटीने वाढली, तर परिणाम शून्य ठरेल. नवी मुंबईत उद्योगांना परवानगी दिली, पण पर्यावरणीय जबाबदारी टाळली, तर त्याचा फटका मुंबईलाच बसेल. शहरांचा श्वास कोंडला की त्याचे परिणाम लगेच दिसत नाहीत, पण दीर्घकाळात ते समाजाच्या आरोग्यावर, उत्पादकतेवर आणि जीवनमानावर खोल घाव घालतात. दिवसाला 'साडेतीन सिगारेटी ओढण्याइतका' प्रदूषणाचा श्वास घेणे, ही उपमा केवळ धक्का देण्यासाठी नाही; ती वास्तव सांगते. हा प्रश्न पुढच्या पिढ्यांवर ढकलण्याचा विषय राहिलेला नाही. मुंबई-पुणे हा भारताच्या आर्थिक गतीचा कणा आहे. पण कणा मजबूत राहण्यासाठी श्वास मोकळा हवा. अन्यथा विकासाचा वेग वाढत राहील, पण तो चालवणारे शहरच दमछाकीत सापडेल. आजचा इशारा आकडेवारीतून येतो आहे. उद्या तो रुग्णालयांच्या आकड्यांतून येईल. तेव्हा उशीर झालेला असेल.

# फॅक्ट शीट बदलली, संदिग्धता कायम!

» **भारत-अमेरिका व्यापार करारासंदर्भातील तथ्यपत्रिका नंतर शांतपणे बदलली जाते, तेव्हा तो केवळ शब्दांचा प्रश्न राहत नाही. तो धोरणातील पारदर्शकता, सामर्थ्यसंतुलन आणि भारताच्या आर्थिक स्वायत्ततेबाबत अस्वस्थ करणारे प्रश्न उभे करतो.**



भारत-अमेरिका व्यापारसंबंध हे गेल्या काही वर्षांत केवळ आयात-निर्यातीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते भू-राजकारण, तंत्रज्ञान, संरक्षण आणि पुरवठा साखळी या सगळ्यांशी घट्ट जोडले गेले आहेत. अशा वेळी या संबंधांतील प्रत्येक शब्द, प्रत्येक करार आणि प्रत्येक तथ्यपत्रिकेतील ओळही महत्त्वाची ठरते. म्हणूनच भारत-अमेरिका व्यापार करारासंदर्भात जाहीर झालेल्या फॅक्ट शीटमध्ये नंतर करण्यात आलेले बदल हे सहज दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. या तथ्यपत्रिकेतून काही कडधान्यांचे उल्लेख वगळले गेले, ही बाब तांत्रिक संपादन म्हणून मांडली जात आहे. मात्र व्यापार धोरणात 'तांत्रिक' असे काही नसते. प्रत्येक शब्दामागे हितसंबंध असतात आणि प्रत्येक वगळण्यामागे दबाव. अमेरिकेसारख्या देशाकडून जाहीर दस्तऐवजात बदल करणे हे दुर्मिळ नाही, पण ते गुपचूप करणे हे अधिक बोलके ठरते. प्रश्न असा की मूळ तथ्यपत्रिकेत जे नमूद होते, ते प्रत्यक्षात मान्यच नव्हते का, की भारताच्या भूमिकेनंतर ते मागे घेतले गेले? कडधान्यांचा मुद्दा केवळ शेतकी व्यापारापुरता नाही. तो भारतीय कृषी व्यवस्थेच्या असुरक्षिततेशी जोडलेला आहे. भारतातील शेतकरी आधीच अस्थिर उत्पन्न, हवामान बदल आणि बाजारातील अनिश्चिततेला सामोरे जात आहेत. अशा स्थितीत स्वस्त आयातीचा दबाव वाढणे म्हणजे देशांतर्गत उत्पादनावर थेट आघात. अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान देते, हे उघड गुपित आहे. अशा अनुदानित उत्पादनांना भारतीय बाजार खुला करणे हे 'मुक्त व्यापारा'च्या नावाखाली अन्यायकारक ठरते. त्यामुळेच कडधान्यांचा उल्लेख वगळणे हे भारतासाठी दिलासादायक वाटू शकते, पण तो दिलासा किती टिकाऊ आहे, हा प्रश्न उरतोच. या सगळ्या प्रक्रियेत सर्वात चिंताजनक बाब म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. व्यापार करार हे केवळ दोन सरकारांमधील कागदपत्रे नसतात; त्याचा परिणाम थेट उद्योग, शेतकरी आणि ग्राहकांवर होतो. त्यामुळे अशा करारांबाबत स्पष्टता अपेक्षित असते. तथ्यपत्रिका बदलली जाते, पण त्याबाबत अधिकृत स्पष्टीकरण येत नाही, हे लोकशाही व्यवस्थेला साजेसे नाही. भारताने याआधीही अनेकदा 'करार झाला' असे सांगितले आणि नंतर त्यातील अटी अस्पष्ट असल्याचे दिसून आले. या अनुभवातून धडा घेण्याची गरज आहे. भारत-अमेरिका व्यापार संबंधांमध्ये असमतोल कायम राहिला आहे. अमेरिका भारताला मोठा बाजार मानते, पण भारतीय सेवांना आणि व्यावसायिकांना तितकीच मोकळीक देण्यास ती तयार नसते. व्हिसा धोरण, डेटा लोकॅलायझेशन, डिजिटल कर या सगळ्या मुद्द्यांवर अमेरिकेची भूमिका नेहमीच स्वहिताची राहिली आहे. अशा परिस्थितीत तथ्यपत्रिकेतील बदल हे केवळ एक उदाहरण आहे, संपूर्ण चित्राचा तो भाग आहे. भारताने प्रत्येक वेळी 'रणनीतिक भागीदारी'च्या नावाखाली आर्थिक तडजोडी करायच्या का, हा प्रश्न गंभीरपणे विचारात घ्यावा लागेल. व्यापार धोरण हे दीर्घकालीन असते. आज दिलेली सवलत उद्या अडचण ठरू शकते. म्हणूनच करार करताना तात्कालिक राजनैतिक फायद्यांपेक्षा देशांतर्गत परिणामांचा विचार महत्त्वाचा ठरतो. कडधान्यांचा उल्लेख वगळला गेला, याचा अर्थ भारताने आपली भूमिका ठाम ठेवली, असे मानायचे की अजूनही चर्चा अपूर्ण आहे, हे स्पष्ट व्हायला हवे. अस्पष्टता ही कधीही चांगल्या धोरणाची खूण नसते. या सगळ्या घडामोडी भारताच्या धोरणक्षमतेचीही परीक्षा घेतात. मोठ्या शक्तींशी व्यवहार करताना आत्मविश्वास आणि स्पष्टता आवश्यक असते. केवळ शब्द बदलून किंवा वाक्य काढून टाकून प्रश्न सुटत नाहीत. व्यापार करार हे आकड्यांचे आणि वस्तूंचे असले, तरी त्यामागे राजकीय इच्छाशक्ती आणि धोरणात्मक स्पष्टता असते. ती नसल्यास करार हे कागदावरच राहतात. अखेर प्रश्न असा उरतो की भारत-अमेरिका व्यापार कराराची दिशा नेमकी कोणती आहे? बदललेल्या तथ्यपत्रिकेमुळे काही तात्कालिक वाद टळले असतील, पण मूलभूत प्रश्न कायम आहेत. भारताला मोठा बाजार म्हणून पाहणाऱ्या अमेरिकेसमोर भारत स्वतःला केवळ ग्राहक म्हणून उभे करणार, की समसमान भागीदार म्हणून? या प्रश्नाचे उत्तर केवळ फॅक्ट शीटमध्ये नाही, तर भारताच्या धोरणात्मक भूमिकेत दडलेले आहे. आणि ती भूमिका जितकी स्पष्ट असेल, तितकी अशी संदिग्धता कमी होईल. या पार्श्वभूमीवर सरकारने केवळ परराष्ट्र धोरणातील यशोगाथा सांगण्याऐवजी, व्यापारविषयक वास्तव देशासमोर मांडणे गरजेचे आहे. जागतिक शक्तींशी व्यवहार करताना आत्मविश्वास म्हणजे मौन नव्हे, तर स्पष्ट भूमिका असते. अन्यथा अशा तथ्यपत्रिका बदलांच्या निमित्ताने भारताची सौदेबाजीची ताकद हळूहळू झिजत जाईल आणि त्याची किंमत शेतकरी, लघुउद्योग आणि अखेर अर्थव्यवस्थेलाच मोजावी लागेल.

## स्वच्छ प्रशासनासाठी महापौर रवी लांडगे ॲक्शन मोडवर

### एकाच विभागात वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या तातडीने बदलीचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कारभारात पारदर्शकता व गतिमानता आणण्यासाठी नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी कडक पाऊल उचलले आहे. महापालिका आस्थापनेवरील एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करण्याचे आदेश त्यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिले आहेत.

महापौर लांडगे यांनी आदेशात नमूद केले की, महानगरपालिकेच्या स्थापत्य, पर्यावरण, नगररचना, बांधकाम परवाना, आरोग्य, वैद्यकीय, करसंकलन, भांडार व उद्यान अशा महत्त्वाच्या विभागांमध्ये अनेक अधिकारी-कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच पदावर कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लेखापाल, भांडारपाल आदी पदांवरील बदल्या दीर्घकाळ प्रलंबित आहेत.

एकाच ठिकाणी दीर्घकाळ राहिल्यामुळे स्थानिक पातळीवर हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता वाढते. परिणामी प्रशासकीय कामकाजात 'अर्थपूर्ण वाटाघाटी' आणि भ्रष्टाचाराला वाव मिळतो, जे महापालिकेच्या प्रतिमेसाठी घातक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पदोन्नती मिळूनही काही अधिकारी-कर्मचारी त्याच विभागात कार्यरत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

विभागप्रमुखांच्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना सोडण्यास होणारा विरोध आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे नागरिकांची कामे रखडत असल्याची खंत व्यक्त करत महापौरांनी तात्काळ फेरबदल करण्याचे निर्देश दिले आहेत. केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल महापौर कार्यालयास सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी आयुक्तांना दिल्या आहेत.

## आमदार अमित गोरखे यांच्या पुढाकारातून ४०० महिलांना स्वावलंबनाचे बळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**प्रभाग १० मध्ये शिलाई मशीन व किट वाटप; महिला सक्षमीकरणासाठी खंबीर पाऊल**

**पिंपरी :** महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आमदार अमित गणपत गोरखे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्रमांक १० मधील ४०० गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन व किटचे वाटप करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रत्यक्ष साहित्य देत त्यांना स्वावलंबी बनवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. "महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर कुटुंब आणि समाज प्रगती करतो. साहित्य वाटपावरच कर्तव्य संपत नाही; त्यांच्या हाताला काम मिळणे महत्त्वाचे आहे," असे आमदार गोरखे यांनी सांगितले. पुढेही महिलांसाठी विविध योजना राबवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या प्रसंगी नगरसेविका अनुराधाताई गोरखे, सुप्रियाताई चांदगुडे, माजी नगरसेविका जयश्रीताई वाघमारे आदी उपस्थित होते. महिलांनी उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत यामुळे सन्मानाने जगण्याचा मार्ग मिळाल्याचे सांगितले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांचा करभरणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याबाबत नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. शहरातील एकूण ७ लाख ३२ हजार ३०२ मिळकतींपैकी तब्बल ५ लाख २६ हजार २२६ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत कर भरला आहे. मात्र, २ लाख ६ हजार ७६ मालमत्ताधारकांकडून अद्याप करभरणा झालेला नसल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

महापालिकेने पहिल्या व दुसऱ्या तिमाहीत कर वेळेत भरणाऱ्यांसाठी विविध सवलती जाहीर केल्या होत्या. या सवलतींचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत नागरिकांनी वेळेत कर भरल्याने करसंकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. नागरिककेंद्रित धोरणाला करदात्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे चित्र आहे.

ऑनलाइन, रोख, धनादेश तसेच ई-डीसीएस या विविध माध्यमांतून करभरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेषतः ऑनलाइन पद्धतीला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक झाली आहे.

अद्याप कर न भरलेल्या मालमत्ताधारकांनी विलंब दंड व पुढील कारवाई टाळण्यासाठी तातडीने करभरणा करावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या अंतर्गत मार्चमध्ये तीन हजार घरांसाठी लॉटरी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र







**पुणे :** MHADA पुणे, पिंपरी-चिंचवडसह 3,000 घरांसाठी लॉटरी मार्चमध्ये** अशी घोषणा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) ने मंगळवारी केली. यापूर्वी पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) हद्दीत 4,186 सदनिकांसाठी लॉटरी काढण्यात आली होती आणि आता त्याचाच पुढचा टप्पा म्हणून अधिक 3,000 किफायतशीर घरांची लॉटरी आयोजित केली जाणार आहे, असे म्हाडाचे सभापती खासदार शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या माहितीतून समजते.

ही घरांची लॉटरी मार्च 2026 मध्ये घेतली जाणार असून, त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड विमाननगरातील सामान्य नागरिकांसाठी परवडणाऱ्या घराचा स्वप्नातला भाग साकार होण्याचा मार्ग खुला होईल, असा विश्वास म्हाडाने व्यक्त केला आहे. गेल्या अडीच वर्षांत MHADA ने सुमारे 25,000 परवडणारी घरं 20% सर्वसमावेशक योजनेतून विक्रीसाठी पुरवली आहेत आणि ही नवीन लॉटरी त्याच प्रयत्नाचा पुढचा भाग आहे. शिरूर येथे 574 निवासी गृहनिर्माण युनिट्स तसेच खराबवाडी येथे 194 व्यापारी गाळे (कमर्शियल गाळे) यांच्या बांधकामाचे काम प्रगतिपथावर आहे. ताथवडे येथील भागाचे पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे सुमारे 80% काम पूर्ण झाले आहे. येत्या काही दिवसांत 750 निवासी तसेच अनिवासी गाळे या लॉटरीत समाविष्ट करण्यात येतील, अशी माहिती सभापती पाटील यांनी दिली.

**अर्ज प्रक्रिया आणि ऑनलाइन सुविधा**

लॉटरीमध्ये सहभागी होण्यासाठी अर्जदारांनी ऑनलाईन नोंदणी, अर्ज भरणे व ऑनलाईन पेमेंट करून अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे.

MHADA ने नवीन सॉफ्टवेअर प्रणाली उपलब्ध करून दिली आहे ज्याद्वारे नागरिक घरबसल्या वेबसाईट किंवा मोबाइल ॲप द्वारे अर्ज प्रक्रिया पूर्ण करू शकतात, असे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल साकोरे यांनी सांगितले.

## युजीसी रेग्युलेशन्स ॲक्ट २०२६च्या समर्थनार्थ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### उच्च शिक्षणात भेदभाव रोखण्यासाठी कठोर अंमलबजावणीची मागणी; समताधिष्ठित शैक्षणिक वातावरणाचा आग्रह

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** "आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र" यांच्या वतीने विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) रेग्युलेशन्स ॲक्ट २०२६ च्या समर्थनार्थ पुणे येथील निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती ज्योती कदम यांना निवेदन सादर करण्यात आले. उच्च शिक्षण संस्थांमध्ये जात, धर्म, लिंग, जन्मस्थान, अपंगत्व आदी आधारांवर होणारा भेदभाव रोखण्यासाठी हा कायदा अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, देशातील अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये आजही विद्यार्थ्यांना सूक्ष्म व उघड भेदभावाला सामोरे जावे लागते. अशा वातावरणामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात. त्यामुळे शैक्षणिक परिसर अधिक समताधिष्ठित, सुरक्षित आणि न्याय्य करण्यासाठी युजीसी रेग्युलेशन्स ॲक्ट २०२६ ची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिनिधींनी नमूद केले.

२०१२ मधील भेदभावविरोधी नियमांची प्रभावी अंमलबजावणी झाली असती, तर रोहित वेमुला व पायल तडवी यांसारख्या कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले नसते, अशी खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली. या दुर्दैवी घटनांनी संपूर्ण देश हादरून गेला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस कायदेशीर यंत्रणा उभी राहणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले.

तसेच, या कायद्यामागे कोणत्याही सर्वसाधारण वर्गातील विद्यार्थ्याला गुन्हेगार ठरवण्याचा हेतू नसून, शैक्षणिक संस्थांमध्ये समान संधी आणि सन्मानाचे वातावरण निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे, असे स्पष्ट करण्यात आले. आवश्यक त्या दुरुस्त्यांसाठी तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक प्रतिनिधी यांच्यामार्फत सखोल चर्चा करून कायदा अधिक सक्षम करावा, अशीही मागणी करण्यात आली.

**भेदभावमुक्त शिक्षणासाठी ठोस उपाययोजनांची मागणी**

● निवेदन सादर करताना "आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ" पुणे जिल्हा प्रतिनिधी चेतन लिंबेकर, प्रदीप पैठणकर, रणजित कुंभार, प्रशांत देठे, ॲड. हार्दिक डोबळे, एस. आर. गायकवाड, प्रशांत कदम, संघशील भद्रे तसेच पुणे जिल्हा समन्वयक ॲड. नितीन घोडके उपस्थित होते. प्रतिनिधींनी शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन शिक्षण क्षेत्रात भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## अनधिकृत बांधकामांना 'पीएमआरडीए'चा दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अनधिकृत बांधकामांविरुद्ध मंगळवारी व्यापक धडक मोहीम राबवत सुमारे चार हजार चौरस फूट बेकायदा बांधकाम जमीनदोस्त केले. या कारवाईत अडीच एकर शासकीय जागा मोकळी करण्यात आली असून, संबंधितांना भविष्यात परवानगीशिवाय बांधकाम केल्यास कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

सेक्टर ९ मधील बेकायदा पत्राशेड्स तसेच सेक्टर ११ मधील ४५ मीटर रस्त्यालगत उभारण्यात आलेली गॅरेजेस आणि लेबर कॅम्प (कोठी) यांच्यावर कारवाई करण्यात आली. वाहनतळासाठी आरक्षित असलेल्या जागेवर उभारलेले पत्राशेड हटवून सुमारे २.५ एकर क्षेत्र प्रशासनाने ताब्यात घेतले. परिसरातील इतर टपरीधारक आणि वाहनतळ व्यावसायिकांना जागा तातडीने मोकळी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय भोर तालुक्यातील शिंदेवाडी येथेही पीएमआरडीएच्या पथकाने बेकायदा होर्डिंग्जविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. नियमबाह्य फलक आणि जाहिराती हटवण्याचे काम सध्या प्रगतिपथावर असल्याची माहिती प्रशासनाने दिली. महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला आणि दक्षता विभागाचे पोलीस अधीक्षक अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. सहआयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, उपायुक्त आशा होळकर, तहसीलदार रवींद्र रांजणे तसेच नियोजन व अभियांत्रिकी विभागाच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यास हायकोर्टाची स्थगिती

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर, उरुळी कांचनसह राज्यातील 2026 मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर व राज वाकोडे यांच्या खंडपीठाने ग्रामविकास विभाग व राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली. निवडणुका न घेता प्रशासक नेमणे लोकशाहीविरोधी असल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला. पुढील सुनावणी 17 फेब्रुवारीला होणार आहे.

### दीड लाखांचे मंगळसूत्र हिसकावणारे तिघे जेरबंद

**दौंड :** दौंडकडे जाणारा रस्ता विचारण्याचा बहाणा करून दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास करणाऱ्या तिघांना दौंड पोलिसांनी अटक केली. वाटलुज येथे घडलेल्या या प्रकारात सुरेखा कोपनर यांच्या गळ्यातील सुमारे एक तोळ्याचे मंगळसूत्र हिसकावून आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले होते. मात्र पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने अनिकेत खंडाळे, अतुल जगताप व सुरेश वायकर यांना पकडून मुद्देमालासह दुचाकी जप्त केली. पुढील तपास सुरू आहे.

### उरुळी कांचनमध्ये पिकअपला कंटेनरची धडक, एक ठार

**उरुळी कांचन :** पुणे–सोलापूर महामार्गावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यासमोर मालवाहतूक पिकअपला भरधाव कंटेनरने धडक दिल्याने किसन बजरंग खंडाळे (४६, रा. घोटी, ता. करमाळा) यांचा जागीच मृत्यू झाला. पत्नी लता, मुलगा सुरज व चालक लक्ष्मण ननवरे गंभीर जखमी झाले. फुले विक्री करून परतताना पहाटे पावणे पाचच्या सुमारास हा अपघात झाला.

## ६,००० कोटींच्या कर्जाला मंत्रिमंडळाची मंजुरी

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला मोठी चालना!

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पुणे :** पुणे जिल्ह्यातील प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला अखेर गती मिळाली असून, महाराष्ट्र मंत्रिमंडळाने भूसंपादनासाठी ६,००० कोटी रुपयांचे कर्ज उभे करण्यास मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे.

भूसंपादनाची प्रक्रिया जलद आणि सुसूत्रपणे पार पाडण्यासाठी विशेष हेतू प्राधिकरण (Special Purpose Vehicle – SPV) स्थापन करण्यात येणार आहे. या एसपीव्हीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (MADC) आणि सिडको (CIDCO) यांचा समावेश असणार आहे. संबंधित संस्थांच्या समन्वयातून निधी उभारणी आणि जमीन संपादनाची प्रक्रिया पार पडणार आहे.

पुरंदर तालुक्यातील सुमारे सात गावांमधील जवळपास ३,००० एकर जमीन या प्रकल्पासाठी आवश्यक आहे. सरकारकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सुमारे ९६ टक्के शेतकऱ्यांनी भूसंपादनासाठी संमती दर्शविली आहे. त्यामुळे प्रकल्पावरील विरोध मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, पुढील टप्प्यात प्रत्यक्ष जमीन हस्तांतरण आणि मोबदला वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू होणार आहे. भूसंपादन प्रक्रियेदरम्यान उद्भवलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांविरोधात दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील विश्वास वाढण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे. पुरंदर विमानतळ पूर्ण झाल्यानंतर पुणे व पश्चिम महाराष्ट्रातील हवाई वाहतुकीची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सध्याच्या पुणे विमानतळावरील मर्यादा लक्षात घेता नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे प्रवासी तसेच मालवाहतूक सेवांना मोठी चालना मिळेल. औद्योगिक गुंतवणूक, पर्यटन आणि रोजगारनिर्मिती यांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्य सरकारने जून २०२६ पर्यंत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. एकूणच, ६,००० कोटी रुपयांच्या कर्जमंजुरीमुळे पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला नवे बळ मिळाले असून, पुणे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## पाबळ महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

विद्यार्थ्यांना साहित्य, निवेदन कौशल्य व सॉफ्ट स्किल्सद्वारे मार्गदर्शन

**लोणी-धामणी :** पाबळ (ता. शिरूर) येथील श्री पद्ममणि जैन महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागांतर्गत "व्यक्तिमत्व विकास" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित या कार्यशाळेला मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेत पाबळचे सुप्रसिद्ध लेखक शंकर नऱ्हे यांनी "साहित्यातून व्यक्तिमत्व विकास" या विषयावर मार्गदर्शन करताना वाचन, चिंतन आणि लेखन या प्रक्रियेमुळे व्यक्तिमत्व अधिक समृद्ध होते, असे सांगितले. बाळासाहेब जाधव कॉलेजचे प्रा. अरविंद कुटे यांनी "निवेदन कौशल्यातून व्यक्तिमत्व विकास व रोजगाराच्या संधी" या विषयावर बोलताना प्रभावी संवादकौशल्य हे करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. कस्तुरी कॉलेजचे प्रा. शिवाजी सोनटक्के यांनी "सुलभ कौशल्ये व व्यक्तिमत्व विकास" या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन, संघभावना आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व पटवून दिले. या प्रसंगी उपप्राचार्या डॉ. रेहाना बेग, सामाजिक कार्यकर्ते कैलास गायकवाड, बाबा ईनामदार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजय घोडेकर व संयोजिका डॉ. शिल्पा शेटे यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक करून उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. गणेश सोनवणे यांनी केले, तर प्रा. अमित उकीर्डे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यशाळेचा लाभ घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जुन्नर तालुका अध्यक्षपदी नयन डुंबरे यांची नियुक्ती!

### अहिल्यानगर जिल्हा पत्रकार अधिवेशनात घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन मोठ्या उत्साहात निघोज येथील जागतिक पर्यटन स्थळ रांजणखळगे परिसरातील मळगंगा देवस्थान सभागृहात संपन्न झाले. या अधिवेशनात जुन्नर तालुका अध्यक्षपदी नयन डुंबरे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गावकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नयन डुंबरे यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके यांच्या उपस्थितीत डुंबरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्तीनंतर नयन डुंबरे व राजेश डोके यांचा आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव गावडे यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

व्यासपीठावर आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, राष्ट्र सह्याद्रीचे संपादक शिवाजीराव शिर्के, महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील उपस्थित होते. तसेच श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद, उपाध्यक्ष अमृता रसाळ, शिवसेना जिल्हाध्यक्ष डी. शिरोळे, माजी सरपंच तुकारामजी लंके, उद्योगपती मच्छिंद्र लंके, राष्ट्रवादी काँग्रेस नेते सोमनाथ वरखडे यांच्यासह अनेक मान्यवर व पत्रकार बांधव उपस्थित होते.

या नियुक्तीमुळे जुन्नर तालुक्यात पत्रकार संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. नवनिर्वाचित अध्यक्ष नयन डुंबरे यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## डॉ. उमेशराज पनेरु यांना 'उत्कृष्ट क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक' पुरस्कार

### सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या ७७ व्या वर्धापन दिनी ग्रामीण विभागातील मानाचा सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथील क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. उमेशराज पदमराज पनेरु यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७७ व्या विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त "उत्कृष्ट क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक" (ग्रामीण विभाग) हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उपकुलगुरू डॉ. पराग काळकर व कुलसचिव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, गौरवचिन्ह आणि मेडल असे होते. या समारंभास पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव संदीप कदम व खजिनदार मोहनराव देशमुख प्रमुख उपस्थित होते. तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. धोंडीराम पवार, बागेश्री मंठाळकर, रविंद्र शिंगणापूरकर, प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, डॉ. ज्योत्सना एकबोटे, सागर वैद्य, डॉ. विजय खरे, डॉ. प्रभाकर देसाई, कुलसचिव चारुशीला गायके, क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पनेरु सप्टेंबर २००८ पासून अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्य वृद्धिंगत व्हावे आणि परिसरात क्रीडा संस्कृती रुजावी या उद्देशाने त्यांनी विविध क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे आणि मार्गदर्शन उपक्रम राबविले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे तीन वर्षे यजमानपद त्यांनी यशस्वीरीत्या भूषविले असून त्यांच्या कार्यकौशल्याची दखल विद्यापीठाने या पुरस्काराद्वारे घेतली आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव (प्रशासन) ए. एम. जाधव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट, उपप्राचार्य डॉ. के. डी. सोनावणे, प्रा. अमृत बनसोडे आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. पुरस्कार स्वीकारताना डॉ. पनेरु यांच्यासमवेत त्यांची पत्नी ममता पनेरु तसेच महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीतील क्रीडा संचालक उपस्थित होते.

## पुणे–सोलापूर महामार्गावर शिवशाही बस अडवून चालकाला मारहाण

### चारचाकीतून आलेल्या ४-५ जणांचा हल्ला; प्रवाशांत भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दौंड :** पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पुण्याहून सोलापूरकडे निघालेल्या एसटी महामंडळाच्या 'शिवशाही' बसला दौंड तालुक्यातील खडकी गावाच्या हद्दीत अडवून चालकाला ४ ते ५ जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात चालक गंभीर जखमी झाला असून भरदिवसा घडलेल्या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शिवशाही बस नियमित फेरीसाठी प्रवाशांना घेऊन पुण्याहून सोलापूरच्या दिशेने जात होती. बस खडकी परिसरात पोहोचताच मागून आलेल्या एका चारचाकी वाहनाने अचानक बसच्या पुढे गाडी आडवी लावली. चालक काही समजण्याच्या आतच त्या वाहनातून ४ ते ५ तरुण खाली उतरले आणि थेट बसमध्ये घुसले. त्यांनी चालकाला शिवीगाळ करत जबरदस्तीने बाहेर ओढले आणि रस्त्यावरच त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली.

या हल्ल्यात चालकाच्या डोक्याला तसेच हातापायाला गंभीर दुखापत झाली आहे. बसमधील प्रवाशांनी घडलेला प्रकार पाहून भीतीने गोंधळ उडाला. काही प्रवाशांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपींनी मारहाण करून तत्काळ घटनास्थळावरून पळ काढला.

## लोणी काळभोरमध्ये जेष्ठ महिलेला धमकी; ६ जणांवर गुन्हा

**लोणी काळभोर (ता. हवेली) :** येथील राहिंजवस्ती परिसरात शेतजमिनीच्या वादातून ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गट क्र. ११२ मधील सुमारे १.२० हेक्टर जमीन ९९ वर्षांच्या कराराने घेतल्याचा दावा करणाऱ्या अलका श्रीहरी जागडे (वय ६८) यांनी फिर्याद दिली आहे.

२६ जानेवारी रोजी आरोपींनी ट्रॅक्टर घालून जबरदस्तीने शेतात लागवड केल्याचा तसेच जाब विचारण्यासाठी गेल्यावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. सुरेश जागडे व इतर पाच जणांवर भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), ३२९(३), ३५१ व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## डुंबरवाडी टोलनाक्यावर स्थानिक वाहनांनाही उद्यापासून टोल अनिवार्य

### खामुंडी-नगर कल्याण महामार्गावरील नियमात बदल; स्थानिकांकडून नाराजी व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळेफाटा :** नगर–कल्याण महामार्गावरील खामुंडी जवळील डुंबरवाडी (ता. जुन्नर) टोलनाक्यावर स्थानिक वाहनांना दिली जाणारी सवलत रद्द करण्यात आली असून दि. ११ फेब्रुवारीपासून सर्व प्रकारच्या व्यावसायिक वाहनांना टोल भरावा लागणार आहे. डुंबरवाडी टोलनाक्याचे व्यवस्थापक योगेश नानकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

कार लाईनमधील वाहनांसाठी सुमारे ३५० रुपये प्रतिमहिना दर निश्चित करण्यात आला असून इतर वाहनांसाठी स्वतंत्र दर आकारण्यात येणार आहेत. यापूर्वी स्थानिक वाहनचालकांना आधारकार्ड दाखवून सवलत दिली जात होती. मात्र, काही व्यावसायिक वाहनचालक 'स्थानिक' असल्याचे सांगून टोल टाळत असल्याने प्रशासनाचे आर्थिक नुकसान होत होते, असे व्यवस्थापक नानकर यांनी दैनिक 'लोकतंत्र'शी बोलताना स्पष्ट केले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून प्राप्त सूचनांनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

या निर्णयामुळे स्थानिक वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. "आधारकार्ड दाखवून मिळणारी सवलतच योग्य होती. सर्वांना मासिक पास घेणे शक्य नाही; अन्यथा तो मोफत द्यावा," अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ प्रशांत डुंबरे यांनी केली आहे. टोल प्रशासनाने सर्व वाहनचालक व मालकांनी नव्या नियमांची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## जारकरवाडी गणातून ५९४ मताधिक्याने दणदणीत विजय; आंबेगाव तालुक्यातील सर्वात तरुण सदस्य म्हणून मान

# पोंदेवाडीतील अंकिता वाळुंज वयाच्या २२व्या वर्षी पंचायत समिती सदस्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी गावातील अंकिता अनिल वाळुंज (वय २२) हिने नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत विजय संपादन करत तालुक्यातील सर्वात तरुण पंचायत समिती सदस्य होण्याचा मान मिळविला आहे. जारकरवाडी पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळालेल्या अंकिता वाळुंज यांनी ५९४ मताधिक्याने प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पराभव करत दणदणीत विजय नोंदविला.

या निवडणुकीत अंकिता वाळुंज यांच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या रोहिणी वाळुंज या मैदानात होत्या. पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या अंकिता यांची लढत अटीतटीची होईल, अशी चर्चा मतदारसंघात रंगली होती. मात्र मतदारांनी तरुण नेतृत्वावर विश्वास दाखवत स्पष्ट कौल दिला. ५९४ मतांच्या फरकाने मिळविलेल्या विजयामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीची दमदार सुरुवात झाली आहे. अंकिता वाळुंज या उच्चशिक्षित असून समाजकार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. घराघरांत जाऊन साधलेला संवाद, स्थानिक प्रश्नांची जाण आणि युवकांशी असलेली जवळीक यामुळे त्यांना व्यापक पाठिंबा मिळाल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या विजयात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, विवेक वळसे पाटील, भीमाशंकर साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील तसेच स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

अंकिता यांच्या कुटुंबालाही राजकीय वारसा लाभलेला आहे. त्यांचे वडील अनिल वाळुंज यांनी पोंदेवाडी गावचे सरपंच म्हणून काम पाहिले असून खरेदी-विक्री संघावरही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. आई निलम वाळुंज यांच्यासह ग्रामस्थांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला. कुटुंबीयांचे पाठबळ आणि ग्रामस्थांचा विश्वास यामुळेच हा विजय शक्य झाल्याची भावना अंकिता यांनी व्यक्त केली. विजयानंतर अंकिता वाळुंज यांनी मतदारांचे आभार मानत, "पोंदेवाडी गणातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. युवक-युवतींसाठी रोजगार, महिला सक्षमीकरण आणि मूलभूत सुविधांवर भर देणार," अशी भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नामदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघातील विविध विकासकामांना गती देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अवघ्या २२व्या वर्षी पंचायत समिती सदस्यपदी निवड होणे ही केवळ वैयक्तिक कामगिरी नसून तालुक्यातील तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरली आहे. तरुण नेतृत्वावर दाखविलेला विश्वास भविष्यातील स्थानिक राजकारणाची दिशा ठरविणारा ठरणार आहे.

## लोणीत महाशिवरात्र यात्रेनिमित्त धार्मिक व क्रीडा कार्यक्रमांची रेलचेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी येथे महाशिवरात्र यात्रेनिमित्त रविवार (दि. १५) रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते १० दरम्यान देवास हारतुरे व मांडव डहाळे, दिंडी सोहळा होणार असून रात्री ७ वाजता छबीना व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

यानंतर मंगळवार (दि. १७) व बुधवार (दि. १८ मार्च) रोजी सकाळी ९ ते सायं. ६ दरम्यान भव्य बैलगाडा शर्यती रंगणार आहेत. या शर्यतीसाठी तब्बल २,७५,१११ रुपयांचे इनाम ठेवण्यात आले असून एलसीडी, ट्रॉफी, फ्रिज, कुलर, टॉवर फॅन, फवारणी पंप तसेच जुपता बैलगाडा अशी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी १,००,००१ रुपये, द्वितीय ७१,००१, तृतीय ४१,००१ व चतुर्थ २५,००१ रुपये ठेवण्यात आले आहेत. फायनल फेरीसाठीही स्वतंत्र बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. घोड्यांच्या शर्यतीसाठीही रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

बैलगाडा शर्यतीसाठी टोकन रविवारी दुपारी १२ ते २ या वेळेत महादेव मंदिर येथे काढण्यात येतील. टोकन फी २ हजार रुपये असून गाडा सोडताना १,५०० रुपये परत केले जाणार आहेत. बुधवार रात्री १० वाजता पांडुरंग मुळे व तुकाराम खेडकर यांचा लोकनाट्य तमाशा होणार आहे.

यात्रा कमिटीने ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## सारांश वृत्त

### नोकरीच्या आमिषाने लाखोंची फसवणूक

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात किमान २१ नोकरी शोधणाऱ्यांना १५.३४ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. एका खासगी कंपनीच्या मालकासह आरोपींनी पीडितांना परदेशात नोकरी देण्याचे आश्वासन देऊन पैसे वसूल केले. भिवंडी शहर पोलिस ठाण्यात एकाने संपर्क साधला आणि संजयकुमार रतनकुमार, त्याचा सहकारी अयान आणि दोन अनोळखी महिलांनी परदेशात नोकरी देण्याचे आमिष दाखवून त्याची आणि इतर अनेकांची फसवणूक केल्याचे सांगितले.

### अल्पवयीनाच्या हत्येप्रकरणी अटक

**नवी दिल्ली :** पश्चिम दिल्लीतील मोती नगर भागातील एका उद्यानात एका अल्पवयीन मुलाची चाकूने वार करून हत्या केल्याच्या आरोपाखाली पाच अल्पवयीन मुलांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. ही घटना डीडीए पार्क येथे घडली जिथे ९ फेब्रुवारी रोजी पीडितेवर, जी स्वतः अल्पवयीन आहे, तिच्या पाठीच्या वरच्या बाजूला चाकूने वार करण्यात आले. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

### वलसाड, नवसारी किनारपट्टीवर धूप

**नवी दिल्ली :** १९९० ते २०२२ दरम्यान गुजरातमधील वलसाडमधील ३६ किमी पेक्षा जास्त आणि नवसारीमधील २४ किमी पेक्षा जास्त किनारपट्टीवर वेगवेगळ्या पातळीची धूप झाली, असे सरकारने बुधवारी संसदेत सांगितले. लोकसभेत भारतीय जनता पक्षाचे (भाजप) खासदार धवल लक्ष्मणभाई पटेल यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात पृथ्वी विज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी ही माहिती दिली. सिंह म्हणाले की, ६२.७८ किमी लांबीच्या वलसाड किनारपट्टीवर २.५ किमी जास्त धूप, ३.२४ किमी मध्यम धूप आणि ३०.८८ किमी कमी धूप झाली आहे.

### भारत-अमेरिका मुक्त व्यापार कराराला विरोध

# शेतकरी संघटनांचे देशव्यापी आंदोलन?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या अमेरिकेसोबतच्या मुक्त व्यापार कराराच्या विरोधात शेतकरी संघटना देशभर आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत. भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय संयोजक राकेश टिकैत यांनी ही घोषणा केली. हे आंदोलन २०२०-२०२१ मध्ये रद्द करण्यात आलेल्या तीन कृषी कायद्यांविरोधातील शेतकरी आंदोलनाच्या धर्तीवर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी नेत्यांच्या मते, भारताने अमेरिका तसेच युरोपियन संघासोबत केलेले मुक्त व्यापार करार शेतकरी हिताविरुद्ध असून त्यांचे दूरगामी आणि प्रतिकूल परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतील. विरोधी पक्षनेते आणि खासदार संजय सिंह, सुधाकर सिंह यांच्यासह अनेक शेतकरी नेत्यांच्या



उपस्थितीत टिकैत यांनी सांगितले की, हे करार भारताच्या शेती व्यवस्थेला कमकुवत करण्याचा धोका निर्माण करतात. सरकारने मागे घेतलेल्या कृषी कायद्यांविरोधातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरच हे देशव्यापी आंदोलन उभारले जाईल, असे टिकैत म्हणाले. हे करार परकीय दबावाखाली करण्यात आले असून त्यांचा भारतीय शेतकरी समुदायावर विनाशकारी परिणाम होईल.

या करारांमुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील आयात-निर्यात कररचनेत मोठा असमतोल निर्माण होत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. अमेरिकेला भारतीय उत्पादनांवर जास्त कर लावण्याची मुभा मिळते, तर भारताकडून अमेरिकन वस्तूंवरील कर जवळपास शून्य करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. हा व्यापार करार नसून धोक्याचा करार आहे. तो देशाच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणारा असून दहा कोटींपेक्षा अधिक शेतकरी कुटुंबांच्या उपजीविकेला धोका निर्माण करतो, असे टिकैत यांनी ठामपणे सांगितले.

जानेवारी महिन्यात भारताने युरोपियन संघासोबत मुक्त व्यापार कराराला अंतिम स्वरूप दिले. त्यानंतर फेब्रुवारीत भारत आणि अमेरिका यांच्यात अंतरिम व्यापार करार जाहीर करण्यात आला. या करारामुळे भारताची निर्यात वाढेल, असा दावा केला जात असला तरी शेतकरी संघटनांनी तो फेटाळून लावला आहे. या करारांमुळे अमेरिकेच्या कृषी क्षेत्राला मोठा फायदा होणार असून भारतात परदेशी कृषी मालाची आयात वाढेल. भारताने अमेरिकेच्या कृषी आणि अन्न उत्पादनांसाठी आपली बाजारपेठ खुली केली आहे. यामध्ये सुक्या डिस्टिलर धान्यांचा, जनावरांच्या चाऱ्यासाठी लाल ज्वारीचा, झाडाच्या काजूंचा, ताजी व प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल यांचा समावेश आहे.

डिस्टिलर धान्यांच्या आयातीमुळे पशुखाद्य आणि चाऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मका, ज्वारी आणि सोयाबीनसारख्या पिकांच्या देशांतर्गत किमती मोठ्या प्रमाणावर घसरण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सोयाबीनच्या शेतमाल किमतींवर परिणाम होईल, असेही संघटनांचे म्हणणे आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि राजस्थानमधील सोयाबीन उत्पादक आधीच किमतीच्या संकटाचा सामना करत असून हा करार परिस्थिती आणखी बिघडवेल, असा इशारा देण्यात आला आहे.


युरोपियन संघ आणि अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदान देतात आणि त्यांच्याकडे प्रचंड कृषी अधिशेष आहे. हा अधिशेष भारतासारख्या देशांत विकण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला.

## नरवणेंचे आत्मचरित्र
# प्रकाशन संस्थेला नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी लिहिलेल्या अप्रकाशित आत्मचरित्राच्या कथित प्रसारणप्रकरणी दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने बुधवारी एका नामांकित प्रकाशन संस्थेला नोटीस बजावून स्पष्टीकरण मागितले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या आत्मचरित्राच्या स्थितीबाबत सुरू असलेल्या दावे-प्रतिदाव्यांच्या पार्श्वभूमीवर तसेच अधिकृत प्रकाशनापूर्वीच हस्तलिखिताच्या अनधिकृत प्रती समाजमाध्यमे आणि इतर माध्यमांवर फिरत असल्याच्या वृत्तांनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, विशेष कक्षाने प्रकाशन संस्थेला नोटीसमार्फत अनेक प्रश्न विचारले असून सुरू असलेल्या तपासाच्या अनुषंगाने सविस्तर उत्तरे देण्यास सांगितले आहे. या प्रकरणात हस्तलिखिताचा डिजिटल तसेच




इतर स्वरूपात अनधिकृत प्रसार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, नोटीसमध्ये प्रकाशन प्रक्रियेबाबत, हस्तलिखिताच्या सुरक्षेबाबत आणि कथित गळतीसंदर्भातील माहिती मागवण्यात आली आहे. या प्रकरणी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाचा हा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनरल नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या आत्मचरित्रावरून हा वाद निर्माण झाला आहे. हे पुस्तक अद्याप अधिकृतरीत्या प्रकाशित झालेले नाही. मात्र, त्याच्या कथित अनधिकृत प्रती प्रसारित झाल्याच्या आरोपांनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वक्तव्यावर ओमर अब्दुल्ला यांचा खेद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बुधवारी विधानसभेच्या कामकाजादरम्यान केलेल्या वक्तव्याबद्दल खेद व्यक्त केला. ही विधाने क्षणिक तणावात केली गेली होती, असे सांगत सभापतींनी ती रेकॉर्डमधून वगळल्यास आपला कोणताही आक्षेप नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभागृहात बोलताना अब्दुल्ला म्हणाले की, कालच्या भाषणात काही असंसदीय शब्द वापरले गेले असतील तर ते वगळण्याचा अधिकार सभापतींकडे आहे. अशा निर्णयाला आपण पूर्णपणे सहकार्य करू, असेही त्यांनी सांगितले.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावरून सलग दुसऱ्या दिवशीही विधानसभेत गोंधळ झाला. भाजप सदस्यांनी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या कथित असंसदीय वक्तव्याबद्दल माफी मागावी, अशी मागणी करत निषेध नोंदवला आणि नंतर सभागृहातून बाहेर पडले. या संदर्भात अब्दुल्ला म्हणाले की, कधी कधी भावनांच्या भरात काही शब्द निघून जातात. आपल्या वक्तव्यामुळे कोणाला दुखावले असेल तर त्याचा आपल्याला पश्चात्ताप आहे, असे त्यांनी नमूद केले. मात्र, आपण कोणाच्याही कुटुंबीयांचा उल्लेख केला नव्हता, असे स्पष्ट करत त्यांनी हा वाद पुढे न वाढवण्याची भूमिका घेतली. मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यापूर्वी भाजप आमदार शामलाल शर्मा यांनी पक्षाच्या सदस्यांकडून फार गंभीर काही बोलले गेले नसल्याचे मत व्यक्त केले आणि कदाचित शब्दांची घसरण झाली असावी, असे सांगितले.

अब्दुल्ला यांनी सांगितले की, पक्षभेद ओलांडून त्यांचे सर्व आमदारांशी सौहार्दपूर्ण संबंध आहेत आणि ते सर्वांशी संवाद साधत आहेत. वेळ मिळाला असता, तर आपण हे वक्तव्य मागे घेतले असते, असेही त्यांनी नमूद केले.

# व्यापार करारावर अमेरिकेचा बदलला सूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत-अमेरिका अंतरिम व्यापार करारासंदर्भात जाहीर करण्यात आलेल्या एकतर्फी तथ्य पत्रकात व्हाईट हाऊसने महत्त्वाचे बदल केल्याचे समोर आले आहे. नवी दिल्लीकडून कर कपात होणाऱ्या कृषी उत्पादनांच्या यादीत नमूद केलेल्या 'काही डाळी' या शब्दांचा उल्लेख आता हटवण्यात आला आहे. त्याचबरोबर भारताने ५०० अब्ज डॉलर किमतीची अमेरिकन उत्पादने खरेदी करण्याबाबत वापरलेली भाषा बदलण्यात आली आहे.

भारत आणि अमेरिकेने परस्पर हिताच्या व्यापारासाठी अंतरिम कराराची चौकट जाहीर केल्यानंतर व्हाईट हाऊसने सोमवारी एक तथ्य पत्रक प्रसिद्ध केले होते. या दस्तऐवजात भारत अमेरिकन औद्योगिक वस्तू तसेच अन्न व कृषी उत्पादनांच्या मोठ्या श्रेणीवरील आयात शुल्क काढून टाकेल किंवा कमी करेल, असे नमूद करण्यात आले होते. या यादीत वाळलेले डिस्टिलर धान्य, लाल ज्वारी, झाडाचे काजू, ताजी व प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, मद्यपेयांसह काही डाळींचाही समावेश होता. मात्र, सहा फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आलेल्या भारत-अमेरिका संयुक्त निवेदनात डाळींचा कोणताही उल्लेख नसल्याने, तथ्य पत्रकातील हा मुद्दा अनेकांसाठी आश्चर्याचा ठरला होता. त्यानंतर आता प्रसिद्ध झालेल्या सुधारित दस्तऐवजात डाळींचा उल्लेख पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. सुधारित तथ्य पत्रकानुसार भारत अमेरिकन औद्योगिक वस्तू आणि अन्न व कृषी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवरील शुल्क काढून टाकेल किंवा कमी करेल, मात्र या यादीत आता डिस्टिलर धान्य, लाल ज्वारी, झाडाचे काजू, ताजी व प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल आणि मद्यपेय एवढाच समावेश आहे. याचबरोबर अमेरिकन उत्पादनांच्या खरेदीबाबत वापरलेली भाषा देखील बदलण्यात आली आहे. आधीच्या तथ्य पत्रकात भारत ५०० अब्ज डॉलरपेक्षा अधिक किमतीची अमेरिकन उत्पादने खरेदी करण्यास कटिबद्ध असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र आता त्या जागी भारत ५०० अब्ज डॉलर किमतीची अमेरिकन उत्पादने खरेदी करण्याचा हेतू ठेवतो, असा म्हटले आहे.

भारत अधिक प्रमाणात अमेरिकन उत्पादने खरेदी करण्याचा मानस व्यक्त करीत असून, त्यामध्ये ऊर्जा क्षेत्रातील उत्पादने, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाशी संबंधित साधने, कोळसा आणि इतर वस्तूंचा समावेश आहे. या बदलांमुळे भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराच्या स्वरूपावर आणि त्याच्या अटींवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

# लोकप्रतिनिधींना परत बोलवण्याचा अधिकार हवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी बुधवारी निवडून दिलेल्या प्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार देण्याची मागणी केली. निवडणुकीत मतदान करणाऱ्या नागरिकांना ठराविक कालावधीनंतर खासदार आणि आमदारांना परत बोलावण्याचा हक्क असला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

चड्ढा म्हणाले की, निवडून आलेले प्रतिनिधी जर मतदारांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरत असतील, तर लोकांना त्यांचा जनादेश परत घेण्याचा अधिकार असला पाहिजे. जगातील २४ देशांमध्ये अशी व्यवस्था अस्तित्वात असल्याचा त्यांनी उल्लेख केला. तसेच कर्नाटक आणि राजस्थानसह काही भारतीय राज्यांमध्ये पंचायत पातळीवर हा अधिकार आधीपासूनच लागू असल्याचे त्यांनी सांगितले. सभागृहात मतभेद निर्माण करणारा मुद्दा उपस्थित करताना चड्ढा म्हणाले की, परत बोलावण्याचा अधिकार हा मतदारांसाठी एक प्रकारची विमा यंत्रणा ठरेल. निवडून आल्यानंतर लोकांसाठी आणि मतदारसंघासाठी काम न करणाऱ्या प्रतिनिधींविरुद्ध मतदारांना कारवाई करण्याची संधी यामुळे मिळेल आणि मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण होईल. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि इतर अनेक घटनात्मक पदांसाठी महाभियोगाची तरतूद असताना, लोकप्रतिनिधींना जबाबदार धरण्यासाठी जनतेलाही तसाच अधिकार मिळायला हवा, असा युक्तिवाद त्यांनी केला.

हा अधिकार लागू केल्यास त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी योग्य सुरक्षा उपाय आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. निवडून दिलेल्या प्रतिनिधीला परत बोलावण्यासाठी संबंधित मतदारसंघातील एकूण मतदारांपैकी किमान ५० टक्के मतदारांनी पाठिंबा दिला तरच तो प्रतिनिधी परत बोलावण्यात आल्याचे घोषित करावे, अशी सूचना त्यांनी केली.

### देशभरात सादर करण्याचे गृह मंत्रालयाचे निर्देश

# राष्ट्रगीतासोबतच आता वंदे मातरम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृह मंत्रालयाने एक सविस्तर अधिसूचना जारी करून अधिकृत व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत जन गण मन सादर करताना त्याआधी वंदे मातरम गायले जाण्याचे निर्देश दिले आहेत. देशभरात समारंभ पद्धतीत एकसमानता आणि स्पष्टता आणणे हा या निर्णयाचा उद्देश असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. या अधिसूचनेत बंकिमचंद्र चॅटर्जी लिखित वंदे मातरमच्या दीडशेव्या वर्धापनदिनानिमित्त राष्ट्रीय गीताच्या सादरीकरणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. वंदे मातरमची अधिकृत रचना सुमारे तीन मिनिटे दहा सेकंदांची आहे. गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, जेव्हा जेव्हा अधिकृत किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत एकत्र सादर केली जातील, तेव्हा प्रथम वंदे मातरम आणि त्यानंतर जन गण मन सादर केले जावे.

अधिसूचनेत राष्ट्रगीताची अधिकृत आवृत्ती कधी वाजवावी याचाही तपशील देण्यात आला आहे. यामध्ये नागरी पदग्रहण समारंभ,




औपचारिक राज्य कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींचे आगमन व प्रस्थान, तसेच आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरून राष्ट्रपतींच्या राष्ट्राला संबोधनापूर्वी आणि नंतर लगेच राष्ट्रगीत सादर करण्याचा समावेश आहे.

राज्यपाल किंवा उपराज्यपाल यांच्या त्यांच्या राज्यांतील किंवा केंद्रशासित प्रदेशांतील औपचारिक राज्य कार्यक्रमांतील आगमन आणि प्रस्थानाच्या वेळीही राष्ट्रगीत वाजवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रध्वज परेडमध्ये आणताना आणि केंद्र सरकारने निर्देश दिलेल्या इतर प्रसंगीही हे गाणे सादर केले जावे, असे नमूद करण्यात आले आहे.

अधिसूचनेत बँड सादरीकरणाच्या शिष्टाचाराचाही उल्लेख आहे. बँडमार्फत सादरीकरण करताना राष्ट्रगीतापूर्वी मंद गतीने ढोल वाजवून सुरुवात करावी, आवाज हळूहळू वाढवून त्यानंतर एक तालाची विश्रांती देऊन गाणे सुरू करावे. याऐवजी स्पष्ट संगीत संकेताचाही वापर करता येईल, असे सांगण्यात आले आहे.

काही प्रसंगी राष्ट्रीय गीत सामूहिक गायनासोबत सादर करणे आवश्यक असल्याचेही अधिसूचनेत नमूद आहे. परेड व्यतिरिक्त सांस्कृतिक किंवा औपचारिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वज फडकवताना तसेच औपचारिक राज्य समारंभ नसलेल्या सरकारी किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींच्या आगमन व प्रस्थानावेळी सामूहिक गायन अपेक्षित आहे. मंत्री किंवा मान्यवर उपस्थित असलेल्या इतर महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये, ते पूर्णपणे औपचारिक नसले तरी योग्य आदर आणि शिष्टाचार राखून वंदे मातरम गायले जाऊ शकते, असेही अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. शाळांना दिवसाची सुरुवात सामूहिक राष्ट्रगीत गायनाने करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाबाबत आदरभाव निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे.

# राफेल विमानांच्या खरेदीचा करार लवकरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलाची क्षमता अधिक मजबूत होण्याच्या दिशेने महत्त्वाची घडामोड घडण्याची शक्यता आहे. भारत आणि फ्रान्स यांच्यात राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी लवकरच मोठा करार होऊ शकतो, असे संकेत मिळत आहेत. भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नागेश कपूर यांनी राफेलला ऑपरेशन सिंदूरचा नायक असल्याचे म्हटले आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने गेल्या वर्षी मे महिन्यात ऑपरेशन सिंदूर सुरू केले होते. या कारवाईत पाकिस्तानी हद्दीत घुसून दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर लक्ष्यित हल्ले करण्यात आले होते. या मोहिमेत राफेल लढाऊ विमानांची भूमिका महत्त्वाची ठरल्याचे हवाई दलाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

एअर मार्शल कपूर यांनी सांगितले की राफेलबाबत सध्या मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. इतर घटकांसोबतच राफेलने ऑपरेशन सिंदूरमध्ये निर्णायक योगदान दिले, असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान भारताच्या अधिकृत दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान ते कृत्रिम बुद्धिमत्तेवरील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होतील तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय संबंधांवर चर्चा करतील.

पंतप्रधान मोदी यांच्या निमंत्रणावरून ही भेट होत असून, मागील वर्षी पंतप्रधानांच्या फ्रान्स दौऱ्यानंतर हा पुढील राजनैतिक टप्पा मानला जात आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी आणखी ११४ राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीबाबत प्राथमिक चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्या भारतीय हवाई दलाकडे मंजूर ४२ स्क्वॉड्रनच्या तुलनेत केवळ ३० स्क्वॉड्रन कार्यरत आहेत. शेजारील देशांमधील बदलती सुरक्षा परिस्थिती आणि वाढते संरक्षणात्मक आव्हान लक्षात घेता हवाई दलाच्या बळकटीकरणाची गरज तीव्र झाली आहे. प्रस्तावित करारामुळे ४.५ पिढीच्या बहुउद्देशीय लढाऊ विमानांची दीर्घकालीन गरज पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## तामिळनाडू भाजपची व्यवस्थापन समिती

**चेन्नई :** तामिळनाडू भाजपने बुधवारी त्यांचे राज्य प्रमुख नैनार नागेंथ्रन यांच्या नेतृत्वाखाली एक विधानसभा निवडणूक व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे जेणेकरून आगामी विधानसभा निवडणुकीला तोंड देण्यासाठी पक्ष यंत्रणा पूर्णपणे सज्ज असेल. पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये सुरळीत समन्वय साधण्यासाठी प्रयत्न करण्यासोबतच, हे पॅनेल भाजपच्या निवडणूक रणनीतीवर देखरेख करेल, असे एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले. नागेनथ्रन हे समितीचे अध्यक्ष असतील.

# निवडणूक अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत आयोगाचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आगामी विधानसभा निवडणुकांच्या तयारीचा भाग म्हणून भारतीय निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या व नियुक्तीबाबत निर्देश जारी केले आहेत.

हे निर्देश आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल तसेच पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील मुख्य निवडणूक अधिकारी आणि मुख्य सचिवांना पाठवण्यात आले आहेत. येथे मे ते जूनदरम्यान विधानसभांचा कार्यकाळ संपत आहे.

निवडणूक आयोगाने आपल्या दीर्घकालीन धोरणाचा पुनरुच्चार करताना स्पष्ट केले आहे की, निवडणुकीशी थेट संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या मूळ जिल्ह्यात काम करू नये किंवा एकाच जिल्ह्यात दीर्घकाळ सेवा देऊ नये. निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी हे धोरण राबवले जात असल्याचे आयोगाने सांगितले आहे.

आयोगाच्या सल्लागारानुसार, निवडणूक कर्तव्यांशी थेट संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला त्यांच्या सध्याच्या महसूल जिल्ह्यात राहण्याची परवानगी दिली जाणार नाही, जर तो त्यांचा गृह जिल्हा असेल किंवा त्यांनी मागील चार वर्षांत त्या जिल्ह्यात तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला असेल.

### बांगलादेश निवडणुकांच्या निकालाकडे लक्ष

# गंगा पाणी करारावर भारताचे 'वाट पाहा' धोरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२६ च्या अखेरीस संपणाऱ्या गंगा नदी पाणीवाटप कराराबाबत भारताने सध्या वाट पाहा आणि पहा अशी भूमिका घेतली आहे. कराराच्या नूतनीकरणासाठी वाटाघाटी सुरू करण्यापूर्वी आगामी निवडणुकांचा निकाल पाहण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. बांगलादेशातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही नवनिर्वाचित सरकार स्थापन झाल्यानंतर चर्चा सुरू करावी, असे संकेत दिले आहेत.

या प्रक्रियेशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, गंगा नदी पाणीवाटप कराराच्या



नूतनीकरणाबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी बांगलादेशातील निवडणुकांचा निकाल जाहीर होण्याची प्रतीक्षा केली जात आहे. बांगलादेशातील सर्वोच्च स्तरावरून भारताला निवडणूक निकाल येईपर्यंत थांबण्याचा सल्ला देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. निवडून न आलेल्या सत्ताकेंद्रांपेक्षा निवडून आलेल्या सरकारशी कराराबाबत चर्चा करणे अधिक योग्य ठरेल, असे मत संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. याच पार्श्वभूमीवर जानेवारी महिन्यात भारताच्या केंद्रीय जल आयोगाच्या पथकाने बांगलादेशाच्या चार सदस्यीय पथकासोबत फरक्का परिसराची पाहणी केली होती. ही पाहणी १९९६ च्या गंगा पाणीवाटप करारातील यंत्रणेअंतर्गत तांत्रिक मूल्यांकनाचा भाग होती. या करारानुसार भारत हा वरच्या प्रवाहावरील देश आहे.

कराराची मुदत संपण्यापूर्वी त्याच्या नूतनीकरणासाठी आवश्यक पायाभरणी करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. याशिवाय, जानेवारी २०२६ मध्ये बांगलादेशातील भारतीय उच्चायुक्त आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे प्रमुख यांच्यात ढाका येथे औपचारिक सौजन्य बैठक झाली होती. मात्र, या चर्चेचा तपशील सार्वजनिक करण्यात आलेला नाही. भारत आणि बांगलादेश यांच्यात १२ डिसेंबर १९९६ रोजी गंगा पाणीवाटप करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या. हा करार विशेषतः फरक्का बंधाऱ्याच्या परिसरात पावसाळ्याबाहेरील काळात गंगेच्या पाण्याच्या वाटपाचे नियमन करतो. तीस वर्षांनंतर हा करार नूतनीकरण करण्याची तरतूद आहे. सध्या ११ मार्च ते ११ मे या कालावधीत दोन्ही देशांना दहा दिवसांच्या टप्प्यांमध्ये आळीपाळीने प्रत्येकी ३५ हजार क्युसेक पाणी पुरवले जाते. मागील वर्षी मे महिन्यात भारत सरकारने बांगलादेशला कळवले होते की केवळ करार वाढवण्याऐवजी त्यावर नव्याने चर्चा करण्यास भारत प्राधान्य देईल. उदयोन्मुख गरजा लक्षात घेता त्याच कालावधीत अतिरिक्त ३० ते ३५ हजार क्युसेक पाण्याची आवश्यकता असल्याचे भारताने नमूद केले होते.

२०२४ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या उठावानंतर तेथील निवडून आलेले सरकार सत्तेतून हटवले गेल्याने दोन्ही देशांमधील विश्वासाचे वातावरण काहीसे ढासळले आहे. या परिस्थितीमुळे भारताची राजनैतिक भूमिका अधिक आव्हानात्मक बनली असल्याचे मानले जात आहे.